## गद्यपाठ १

## ससीकरक्षण

ठळक मुद्दे

- **लेखक: म्हाइंभट**
- **लीळेतील शिकवण -** मुक्या जीवांचे रक्षण, शरण आलेल्यांना अभय, दुसऱ्या माणसाचे मतपरिवर्तन, आपल्या भूमिकेवर ठाम असणे, अहिंसा.
- **चक्रधर स्वामींचे व्यक्तीमत्त्व -** उदार, कनवाळू ,अहिंसक, निर्भय,शरण आलेल्या जीवाला अभय देणारे, मतपरिवर्तक, सुभाषी
- **भाषिक वैशिष्ट्ये:** साधी, सोपी वाक्ये,छोटी ओघवती वाक्यरचना, यादवकाळातील बोली भाषेचे रूप,मधुर, चक्रधरांची स्वत:ची शैली,'जी-जी, हां गा' सारखी साधी संबोधके, एकाचप्रकारच्या विरामचिन्हाचा वापर, भूतकाळाच्या रुपांसारखी भविष्यकाळाची रूपे उदा.'तरि हा गोसावीं राखीला',
- **स्वाध्याय-** उजळणी प्रश्न, वैचारिक प्रश्न

**प्रस्तावना:**

'ससीकरक्षण' ही लीळा चक्रधरस्वामींच्या चरित्रातून घेतली आहे ज्याचे नाव '**लीळाचरित्र**' आहे. लीळा म्हणजे आठवणी. आठवणींच्या स्वरूपातील चरित्र. चरित्र हे एखाद्या व्यक्तीविषयी दुसऱ्या एका व्यक्तीने लिहिलेले असते. तसे ह्या लीळा म्हाइंभट ह्या चक्रधरस्वामींच्या शिष्याने ऐकून,आठवून व इतर शिष्यांकडून गोळाकरून लिहिल्या आहेत. चक्रधरस्वामींच्या निधनानंतर शिष्यमंडळी स्वामींच्या लीळा आठवीत बसत. त्यातूनच पुढे 'लीळाचरित्राची' निर्मिती झाली असे समजले जाते.

**लीळाचरित्र याविषयी अधिक माहिती येथे वाचा-**

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B2%E0%A5%80%E0%A4%B3%E0%A4%BE%E0%A4%9A%E0%A4%B0%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%B0

**चक्रधरस्वामींविषयी अधिक माहिती येथे वाचा-**

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%9A%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%A7%E0%A4%B0%E0%A4%B8%E0%A5%8D%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%AE%E0%A5%80

**लीळाचरित्राची रचना**

चक्रधरस्वामींनी स्थापलेल्या **महानुभाव** पंथात अहिंसा हे एक महत्त्वाचे तत्त्व होते.हे तत्त्व त्यांच्या इतरही लीळांमधून पुढे येते. ह्या शिकवणीची अनेक उदाहरणे एकाक ह्या ग्रंथात पहायला मिळतात. 'एकाक' हा लीळाचरित्राचा पहिला भाग.असे हे चरित्र तीन भागांत लिहिले गेले जे **एकाक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध** अशा स्वरूपात वाचायला मिळते.

महानुभाव पंथ-

http://www.marathivishwakosh.in/khandas/khand12/index.php?option=com_content&view=article&id=10505

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AE%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A5%81%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B5_%E0%A4%AA%E0%A4%82%E0%A4%A5

**महानुभावपंथाचे विशेष**

महानुभाव पंथ ज्या काळात उदयाला आला तो काळ यादव साम्राज्याचा काळ होता. जैन, नाथ, लिंगायत आदी पंथ महानुभावपंथाच्या आधी अस्तित्त्वात होते. ह्या पंथांनी सर्वसामान्य लोकांना भक्तीमार्गाकडे वळवण्याची सुरुवात केली होती. महानुभावपंथाने ह्यापुढे जाऊन जातिनिरपेक्षतेचा आणि अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केला. म्हणजे ह्या पंथात वरच्या जातींप्रमाणे खालच्या जातीतील लोकांनाही प्रवेश होता. शिवाय स्त्रियांचे स्थानही पंथात विशेषत्त्वाने होते.स्वत:चे वेगळेपण दाखवण्यासाठी या पंथातील लोक काळे कपडे घालून वावरत.शिवाय या पंथातील साहित्याला धोका निर्माण होऊ नये म्हणून त्याला सांकेतिक लिपीत लिहिले गेले ज्याला सकळ लिपी आणि सुंदरी लिपी स म्हणले गेले.

**चक्रधर आणि समाज**

चक्रधरांचा वावर समाजाच्या सर्व स्तरांतून होता. त्यामुळे त्या त्या स्तरातील विविध व्यक्तीचित्रे आपल्याला त्यांच्या लीळांच्या म्हणजे आठवणीच्या माध्यमातून वाचायला मिळतात. 'ससीक रक्षण' लीळेत फासेपारधींबरोबरची आठवण वाचायला मिळते.

**लीळेचा आशय**

'ससीक रक्षण' ही अतिशय सहज समजेल अशी आठवण आहे. लीळेची भाषा यादवकालीन असूनही समजायला सोपी आहे. ससीकरक्षण ह्या आठवणीत फासेपारधी सश्याची पैज लावतात. त्या सशाला पकडण्यासाठी एक कुत्रेही सोडतात. हा ससा चक्रधर ज्या वृक्षाखाली 'आसन' म्हणजे विश्रांती घेत असतात, त्या ठिकाणी येतो व घाबरून त्यांच्या मांडीखाली लपतो. पारधी चक्रधरांना विनवतात की आमचा ससा सोडावा. नाहीतर ह्यावरून 'सूरीया काढणीया होती' म्हणजे मारामारी होईल. चक्रधर स्वामी सशाच्या जीवाच्या रक्षणाची जबाबदारी घेतात. ते पाहून पारधी वरमतात व निघून

जातात. शरण आलेल्याला मरण नसते असे ते सांगतात. ‘ससीक रक्षण’ ही लीळा चक्रधरस्वामींच्या अहिंसक वृत्तीची साक्ष तर देतेच शिवाय पशुपक्ष्यांवरील प्रेमाचे उदाहरण देते.

**चक्रधरांचे गुण विशेष**

‘ससीक रक्षण’ ही लीळा अहिंसा, भूतदया, पशुपक्षींविषयी प्रेम ही शिकवण देते. सशाचे मांडीखाली दडणे ही सशाने जणू न बोलता केलेली विनवणी आहे जी चक्रधरांना समजते. कारण चक्रधर मुक्या जीवाची भाषा, त्यांची असहायता समजू शकतात. मुक्या जीवांविषयी असलेली कणव, प्रेम आणि दया चक्रधर आपल्या कृतीतून दाखवतात. ह्या व्यतिरिक्त सशाला दिलेले अभय चक्रधरांचा निर्धारही दर्शवते. शरण आलेल्या जीवाचे रक्षण करणे, त्याला मदत करणे ह्यासाठी लागणारे धैर्यदेखील त्यातून स्पष्ट होते. चक्रधरांच्या शांत आणि निग्रही भूमिकेमुळे मारामारीवर आलेले पारधीही नरमतात आणि चक्रधरांचे म्हणणे ऐकतात. ह्यातून मतपरिवर्तन करण्यासाठी अहिंसक वृत्ती व सौम्य वाणीदेखील कशी प्रभावी ठरते ह्याची शिकवण आपल्याला मिळते. शिवाय माणूस असो वा पशू सर्व एकसमान आहेत ही दृष्टीही दिसून येते. सशाला चक्रधरस्वामींचे ‘महात्मे हो’ असे संबोधने हे ह्या दृष्टीने पुरेसे बोलके आहे.(महानुभाव पंथात एकमेकांना ‘महात्मे’ संबोधायची पद्धत होती)

**भाषिक वैशिष्ट्ये**

ही लीळा वाचताना तुमच्या लक्षात आले असेल की प्रश्नचिन्ह, अवतरणचिन्ह, उद्गार चिन्ह ह्यात नाहीत. अपूर्णविराम हे एकच चिन्ह वरील सर्व चिन्हांचे काम करते. यादवकालीन भाषेचे हे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. वाक्य रचना साधी, सोपी,,छोटी व ओघवती आहे. त्यामुळे वर्णनात जिवंतपणा येतो. ही लीळा, यादवकाळातील बोली भाषेचे रूप आहे ज्यात माधुर्य आहे**. विनविलें, म्हणितले** अशी एकारान्त क्रियापदांची रचना आहे.एकाकातील लीळा चक्रधरांनी सांगितलेल्या आहेत. त्यामुळे त्यात त्यांची स्वत:ची शैली दिसते ,’जी-जी, हां गा’ सारखी साधी संबोधके, व त्यातील वैविध्य लक्षात घेण्यासारखे आहे.

**<u>उजळणी प्रश्न</u>**

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१) ससीक रक्षण ह्या लीळेतील कथा तुमच्या शब्दांत लिहा.
२) ‘महात्मे हो’ असे चक्रधर कोणाला संबोधतात व का?

पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१) चक्रधरांच्या कोणत्या गुणविशेषांमुळे सशाच्या जीवाचे रक्षण होते?

संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

१) ‘हां गा: एथ सरण आलेया काइ मरण असे’

**<u>मुक्त प्रश्न</u>**

भाषेविषयी:

१) पुढील क्रियापदांसाठी लीळेतील क्रियापदांची योग्य जोडी शोधा.
बसणे, शिरला, संभाळणे
पर्याय: रिगाला, आसन, राखीला

२) ससीकरक्षण लीलीळेची भाषा वैशिष्ट्ये उदाहरणे देऊन सांगा.

३) यथे क्लिक केल्यावर तुम्हाला काही लीळा वाचायला मिळतील. त्या लीळा चक्रधरांच्या  व्यक्तीमत्त्वाचे वेगवेगळे पैलू पुढे आणतात. काही लीळा त्या काळातील खेळ, रीती ह्यांचही दर्शन घडवतात.त्या वाचताना जुन्या भाषेचे भाषिक सौंदर्य तुम्हाला लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. तसेच आजच्या काळात त्यातील अनेक शब्द त्या काळातही तसेच किंवा थोड्या बदलाने अस्तित्वात होते हेही लक्षात येईल. ह्या लीळा लक्षपूर्वक वाचा आणि तुम्हाला जाणवलेले भाषिक विशेष, चक्रधरस्वामींच्या स्वभावातले पैलू, शिकवण लिहा.